

# प्रस्तावना

प्रस्तावना

**आज**, तुम्हा सर्वांसमोर ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांबाबत **शासन निर्णय संग्रह पुस्तिका** सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. पाणी पुरवठा व स्वस्छता विभागामार्फत पाणी पुरवठा धोरण/जलजीवन मिशन अंतर्गत कार्यक्रम राबवित असतांना याप्रकारे पूर्वी एकत्रीत Collection अथवा संग्रह उपलब्ध झालेला नाही, त्याकरिता या संबंधीच्या निर्णयांची संग्रहरुपी पुस्तिका तयार करून तुमच्या व आपल्या सर्वांसाठी योजनेच्या अंमलबजावणीसाठी तयार करून सादर करण्यात येत आहे. हा संग्रह योजनांचे निकष, उद्दिष्टे व वेळोवेळी झालेले निर्णय याचा निश्चितच फायदा होण्यासाठी तयार करण्यात आला आहे. तुम्ही, मी किंवा आपण सर्व प्रत्यक्ष योजनांचे कामकाज हाताळत असतांना किंबहुना अंमलबजावणी करताना या ज्ञानरुपी भंडारा नुसार अथवा अशी सामुग्री उपलब्ध असेल तर सक्षमतेने निर्णय घेऊ शकतो हे अनुभवाने सिद्ध झाले आहे.

ही तुमची, माझी व आपल्या सर्वांचीच कर्मभुमी आहे. तीच्या ठायी काम करत असतांना कामकाज प्रगल्भतेने होणे अथवा करणे हे कुण्या एकाचे नव्हे तर, आपल्या सर्वांचेच काम आहे. याकरिता योजनेच्या किंबहुना विभागाच्या सुरुवातीपासुनच्या निर्णयापासुन ते आजतागायत पर्यंतचे धोरण, निर्णय व सुचना यांचे एकत्रित संकलन करून जुन्या संदर्भावर प्रक्रिया करून, तंत्रज्ञानाचा वापर करून सुस्पष्ट संग्रह पुस्तिका तयार करण्यात आली आहे. हा संग्रह डिजिटल स्वरुपामध्ये देखिल विभागाच्या संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहे. परंतु ग्रामीण किंवा तालुकास्तरावर आपणांस ते तत्परतेने उपलब्ध झाल्यास अथवा हाताशी असल्यास किती फायदा होतो हे पुन्हा पुन्हा सांगावयास नको. मी फक्त सूचना केल्यानंतर संग्रह पुस्तिका तयार करणेअथवा कल्पना प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी व ती आपणापर्यंत पोहचविण्याकरिता विभागातील अधिकारी यांनी प्रयत्न केले. यामध्ये प्रामुख्याने **श्री. वसंत माने**-उप सचिव व श्री. **संजय काळभोर**-अवर सचिव यांचा सहभाग आहे; हे मला येथे नमुद करावेसे वाटते.

मला अशी आशा आहे की, तुम्हा सर्वांना या पुस्तिकेचा कामकाजामध्ये भरपुर उपयोग होईल व त्यामुळे **जल जीवन मिशन** प्रभावीपणे राबविण्यास निश्चितच मदत होईल; अशीही मला खात्री आहे.

Sjaiswal

**(संजीव जयस्वाल)**
प्रधान सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई.